# ४. विलायती पीक

- शंकर पाटील

शंकर बाबाजी पाटील (१९२६-१९९४)

मराठी ग्रामीण कथेचे शिल्पकार. रयत शिक्षण संस्थेच्या शाळेतून अध्यापन. आकाशवाणी पुणे केंद्रावर काही काळ नियुक्ती. कथा, कादंबरी, पटकथा, वगनाट्ये या प्रकारात विपुल लेखन. खेड्यातील माणूस, त्यांचे परस्पर संबंध आणि ग्रामीण मानसिकता हे त्यांच्या साहित्याचे विषय राहिले आहेत.

१९५८ साली 'वळीव' हा पहिला ग्रामीण कथासंग्रह प्रकाशित. यानंतर 'भेटीगाठी', 'आभाळ', 'धिंड', 'ऊन', 'वावरी शेंग', 'खुळ्याची चावडी', 'पाहुणी','फक्कड गोष्टी', 'खेळखंडोबा' इ. कथासंग्रह प्रकाशित. 'टारफुला' ही ग्रामीण कादंबरी, याशिवाय 'गल्ली ते दिल्ली', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'लवंगी मिरची कोल्हापूरची' इ. वगनाट्ये लोकप्रिय. 'वावटळ','युगे युगे मी वाट पाहिली', 'गणगौळण, 'भोळी भाबडी', 'चोरीचा मामला', 'पिंजरा' इ. चित्रपट कथा त्यांनी लिहिल्या. १९९५ साली नांदेड येथे भरलेल्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

शासकीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांची शेतीच्या मूळ प्रश्नांशी फारकत झाल्यामुळे चांगल्या सरकारी योजनांचा बट्ट्याबोळ होतो. परिणामी शेतकऱ्यांची फसवणूक होते. याचे वास्तवपूर्ण आणि विनोदी चित्रण 'विलायती पीक' या कथेतून येते.

सप्टेंबर महिन्यातल्या एका दुपारी आत मास्तरांना डुलका लागलेला बघून पोरं बाहेर येऊन खेळत होती; खेळता खेळता एकमेकांना शिव्या देत होती, हसत होती, दात खाऊन भांडत होती. पण रस्त्यावरचा हा गलबला एकाएकी कमी झाला. पुढं पट्टेवाला आणि डोक्यावर साहेबी टोपी या दोन महत्त्वाच्या खुणा बघून कुणीतरी साहेब गावात आलाय् याची चाहूल पोरांना लागली. कोणता साहेब आलाय् हेच फक्त कळायचं होतं.

सामानाच्या ओझ्यानं वाकलेला पट्टेवाला पोरांच्या जवळ येऊन म्हणाला, "चावडीकडं जाणारा रस्ता ह्योच का ?"

रस्ता एकच होता; पण दहाजणांनी दहा तऱ्हांनी सांगितल्यामुळं चालून-चालून आधीच दमलेल्या त्या लोकांच्या तोंडचं पाणी पळालं होतं. थकून गेलेला साहेब म्हणाला, "कुणीतरी एकजण बरोबर येता का ?

कुणीतरी एकजण बरोबर जाण्याऐवजी दहावीस पोरांचा लोंढाच्या लोंढा साहेबाला घेऊन चावडीकडे निघाला. मागं पोरं, पुढं पोरं, आणि मध्यभागी साहेब आणि त्याचा पट्टेवाला, अशी ही मिरवणूक रमतगमत चावडीवर आली, तसा झोपेतून दचकून उठलेला तलाठी पोरांच्या अंगावर खेकसून म्हणाला-

"काय रं पोरानो, शाळाफिळा काय हाय का न्हाई तुम्हाला? प्रभातफेरी काढल्यागत सगळी कशाला गोळाहून आलाय हितं ?"



Scanned with OKEN Scanner

पोरं लांब जाऊन उभी राहिली तसं तलाठ्याचं लक्ष साहेबाकडे गेलं.

अदबीनं त्याला सामोरा जात तलाठी तोंड पसरून म्हणाला,

"वेळ केला यायला ? मी लई उशीर वाट बगतोय् तुमची."

नुकती पदवी घेऊन आलेला ते तरुण रक्ताचा साहेब डोक्यावरची हॅट काढून घाम पुसायच्या आधीच ओरडला, "तुम्ही वाट बघत नुसते इथं कशाला बसलाय? जरा स्टँडपर्यंत चालत आला असता तर काय बिघडलं असतं ?"

तलाठी निर्विकार चेहऱ्यानं म्हणाला,

"त्येच ! निघायचाच विचार करीत व्हतो."

"मग कुणी अडवलं तुम्हाला ? दोन मैल रखडत आलो ! एखादा छकडा ठेवला असता तर काय भाडं दिलं नसतं आम्ही ?"

तलाठी त्यांना समजावून सांगू लागला.

"साहेब, भाड्याचा काही प्रश्न न्हाई वो."

डोक्यावरची हॅट काढून रुमालानं कपाळावरचा घाम पुसत साहेब म्हणाले-"मग काय गावात एक छकडा मिळाला नाही तुम्हाला ?"

"तीच पंचायत होऊन बसलीया न्हवं !"

अहो आम्ही येणार हे तुम्हाला कळवल नव्हतं का ?

"तुम्ही कळवलं व्हतं हे खरं-"

"बरं, छकडा राहू द्या; लोक कुठं आहेत ?" साहेबानं विचारलं.

तलाठी विचार न करता उत्तरला,

"लोक रानात हैत."

साहेब चरफडून म्हणाला-"अहो, काही विचार करून बोलताय् का तुम्ही ?"

"त्यात इचार आणि काय करायचा? ते काय लबाड बोलायचं हाय व्हय तवा इचार करावा ?"

साहेबांचा पारा चढू लागला. लालबुंद चेहरा करून तो म्हणाला,

"तुम्हाला लोक जमवायला काय झालं होतं ?"

"कसं लोक जमवायचं ? द्यायची तशी दवंडी दिली व्हती. पर लोक जमले न्हाईत त्येला काय करू ?"

रब्बी पिकांच्या मोहिमेचा धडाक्यानं प्रचार करायला बाहेर पडलेल्या त्या शेतकी अधिकाऱ्याला, अमुक अमुक दिवशी आपण येणार हे आधी कळवूनही लोक जमू नयेत याचं आश्चर्य वाटलं; मनस्वी खेदही झाला. पुन्हा एकदा तोंडावरचा घाम पुसून साहेब म्हणाला, "अहो, वॉर फूटिंगवर ह्या मोहिमेचा प्रचार चालू असून लोक रानात आहेत म्हणता, मग ही मोहिम यशस्वी कशी व्हायची ?"

तलाठी शांतपणानं म्हणाला, "अहो, त्यांचीबी मोहीमच चाललीया साहेब !"

"म्हणजे ?"

"म्हंजे काय ? वाफसा आलाय तंवर पेरन्या आटपाय नकोत ?" रानांतली पेरनी सोडून भाषान ऐकायला कोन जमंल काय, साहेब ?"

"अहो, या रब्बी पिकांच्या मोहिमेबद्दलच मी बोलणार आहे."

"त्ये झालं वो. पर येळ आली तर घरातलं मयत झाकून जितं लोक आधी पेरनी करून घेत्यात, तितं तुमचं भाषान कोन ऐकंल आणि छकडा तरी कुटला मिळंल ?"

पहिल्याच गावानं असा हिसका दाखवल्यावर साहेब फार निरुत्साही झाला. एवढी मोठी मोहीम सरकारनं सुरू केली असता शेतकऱ्यांनी तिकडे डोळेझाक करावी यासारखी दुर्दैवाची गोष्ट तरी कोणती होती? लोकांची ही उमेद बघून साहेबांचा उत्साह मावळला. तो खिन्न मनानं विचार करीत बसला. तसा तलाठी म्हणलाा,

"आता ह्या टायमाला रानांतल्या पेरन्या सोडून कोन येणार न्हाई बगा."

साहेब निश्चयाने म्हणाला, "असं नाही चालायचं! लोकांना आधी गोळा करा. हा अन्नधान्याचा प्रश्न आहे. प्रचार झालाच पाहिजे !"

"त्ये सगळे खरं ! पर लोकांचाबी अन्नधान्याचाच प्रश्न हाय !"

काही केल्या साहेबांना तलाठ्याचं म्हणणं पटेना, आणि तलाठ्याला साहेबांना कसं पटवून सांगावं हे कळेना. हर तऱ्हांनी आपलं म्हणणं पटवण्याचा प्रयत्न करून दमल्यावर तलाठी म्हणाला,

"साह्येब, लोकांस्नी काय धरून आनायचं हाय का ?"

"ते काय पाहिजे ते करा; पण लोक गोळा करा!"

"अहो, लोक गोळा करा हे खरं; पर गोळा करायचं कसं, साह्यब ?"

"ते मला काही सांगू नका !"

साहेबाचा करारीपणा ध्यानात घेऊन तलाठी म्हणाला, "मग असं करा, ऱ्हावा आजच्या दीस. रातच्याला चार लोक जमवू आणि मंग सभा झाल्यावर सकाळी उठून जावा."

साहेब चिडून म्हणाले, "अहो, एवढी फुरसत नाही आम्हाला. एकेका दिवसांत दोनदोन-तीनतीन गावं मारायची आहेत!"

"म्हंजे एकदम धावता दौरा हाय म्हना की !"

"नुसती घोडदौड आहे ! सकाळी एक गाव झालं. आता दुपारी तुमचं एक मारायचं, आणि रात्री तिसरं."

साहेब गाव मारल्याशिवाय काही पुढं जायला तयार नाही, हे बघून खुद्द तलाठीच लोकांना बोलवायला बाहेर पडला. कुणाला अण्णाबाबा म्हणून, तर कुणाला दम देऊन, चार लोक पुढं घालूनच तलाठी चावडीवर परत आला. चार-आठच लोक बघून साहेबांनी विचारलं, "येवढेच लोक जमले ?"

"त्ये का ? भरतीला ही शाळेतली पोरं हैतच की !"

"ही पोरं काय करायची ?"

"अहो, कोंच्याबी सभोत पोरंच फुडं असत्यात, साह्येब !" असं म्हणून तलाठ्यानं पोरांना हटकलं. एक खुर्ची पुढं ठेवली. खुर्चीसमोर पोरं मांडी घालून बसली आणि त्यांच्या मागं धरून आणलेले चार-आठ लोक काळजी करीत बसून राहिले. साहेबांनी वेळप्रसंग बघून प्रचाराचं स्वरूप संभाषणाच्या थाटाचं ठेवलं. बैठकीत बोलावं तसं ते म्हणले,

"मंडळी, रब्बी पिकांची मोहीम सुरू झालीय. तुमच्या काही हालचाली सुरू झाल्या आहेत की नाहीत ?"

हरिबा आणि केरबा ही गावातली एक इरसाल जोडी होती. एकमेकांना डोळा



Scanned with OKEN Scanner

घालून हरिबा म्हणाला, "म्होईम सुरू झालीया तर काय करावं म्हनता?"

"ती यशस्वी करायला पाहिजे."

केरबा म्हणाला, "ती यशस्वी करायची तर मग आमाला पेरनी टाकून हितं कशापायी आनलं?"

साहेब जीव तोडून रब्बी हंगामाच्या मोहिमेचं महत्त्व पटवून देऊ लागले आणि लोकांना या कशाचंच काही वाटेनासं झालं. या आडवळणी गावात काही सुधारणाच दिसेनाशी झाली. स्वातंत्र्य मिळाल्यापासून शेतकी खात्याने इतक्या सुधारणा करूनही हे गाव पूर्ण अंधारातच राहिल्यासारखं वाटत होतं. या गावात आजवर शेतकीविषयक काय-काय सुधारणा झाल्या आहेत याचा अंदाज घ्यावा म्हणून साहेबांनी विचारलं,

"जपानी भातशेती तुम्ही करता का नाही?"

हरिबा म्हणाला, "चातक वरडून वरडून मेला तरी पाऊस पडत न्हाई आणि जपानी भात कशाला करतोय्?"

हरिबाला साथ देत केरबा म्हणाला,

"साह्येब, देशी भात आमाला करायचं होत न्हाई आणि जपानी-जर्मनी भात कशाला करावा?"

जनतेचं हे घोर अज्ञान बघून साहेबांना कीव आली. आपला घसा फोडून त्यांनी जपानी भातशेतीची पद्धतशीर माहिती दिली. रान जाळू नये, नेहमीप्रमाणं पेरणी करू नये, बियाणं जास्त वापरू नये, इत्यादी काही नवलाईचे मुद्दे त्यांनी कळकळीनं सांगितले. हे पुराण एक तासभर ऐकून घेतल्यावर हरिबा म्हणाला,

"साह्येब, गादी वाफा करून रोप लावणी करावी हे खरं; पर त्याला पानी कुटलं पाजावं वो? का ते जपान देशातनं आनायचं?"

साहेबांनी विचारलं "विहिरी नाहीत का?"

"मंग बाकीच्या बागायतीचं काय करावं?"

याला साहेब काही उत्तर देण्याआधीच केरबानं शंका विचारली, "साहेब, ही जपानी भातशेती जर चांगली असती, तर आमच्या आज्या-पंज्यांनी ती करून बगितली नसती का? त्यांच्यापरीस आमी लई शानं झालो?"

हरिबा आणि केरबा असं वाकडं लावू लागले, तशी साहेब म्हणाले, "बरं, ह्या जपानी भातशेतीचं एक राहू द्या; पण सुधारलेला भाजीपाला तरी करता का नाही?"

"सुधारक भाजीपाला आणि कसला असतोय्? आमी आपली भेंडी, बांवची, कुठं वांगीबिंगी, कुठं चाकवत, कुठं राजगिरा, असं करतोय्"

"मग ह्यात नवीन काय करता?"

"नवीन करावं तरी काय म्हणता?"

साहेब सांगू लागले, "नवीन करण्यासारखं पुष्कळ आहे. कोबी, फुलवर, नवलकोल, सुरण, कुर्का, याम्, डबलबीन, अशा किती तरी प्रकारच्या पालेभाज्या आणि फळभाज्या घेता येतील."

केरबा हे सगळं ऐकून म्हणाला,

"ही सगळी इलायती पिकं दिसत्यात! ही करून खानार कोन वो?"

"काय झालं न खांयला?"



Scanned with OKEN Scanner

"खायला काय होतंय् ? तोंडं हैत खाणारी; पर करून घालणार कोन ?"

"त्यात काय अवघड आहे ?"

केरबा हसून म्हणाला, "त्यात काय अवघाड हाय, त्ये इचार आमच्या बायकांस्नी, म्हंजे सांगतील !"

हरिबा आणि केरबा या जोडीला साहेबांची कुठलीच गोष्ट पटत नव्हती; पण विलायती भाजीपाल्याचा परिणाम एकदोघांवर चांगला झाला. विशेषतः कुळकायदा अस्तित्वात आल्यामुळे नव्यानेच शेती करू लागलेल्या दिगंबरपंतांना या कोबीची लागवड करावीशी वाटून ते म्हणाले, "साहेब, कोबीची लागवड कशी काय येईल बरं आमच्या रानात ?"

साहेबांनी विचारलं, "जमीन निचऱ्याची आहे काय ?"

"हो, पाणी वाहून जाणारी आहे."

"मग डोळे झाकून खुशाल कोबीची लागवड करा !"

निदान एका गृहस्थावर तरी आपल्या बोलण्याचा परिणाम दिसून आला हे पाहून साहेबांना मोठा हुरूप आला. रब्बी हंगामातील इतर पिकांविषयी ते उत्साहाने बोलू लागले-

"तुम्ही 'मालदांडी पस्तीस-एक' हे ज्वारीचं बी घेतलं की नाही ?"

"निम्या पेरन्या झाल्या आनि कशाचं मालदांडी नि फिलदांडी ! जे बी मिळालं ते घेतलं बगा !"

बी-बियाण्याची निवड उत्तम केली नाही, चांगल्या सुधारलेल्या जातीचं बियाणं वापरलं नाही, तर ही मोहीम यशस्वी कशी व्हायची, अशी चिंता लागून साहेब म्हणाले, "अहो, ही मोहीम म्हणजे धान्याच्या टंचाईविरुद्ध पुकारलेली लढाई आहे ! 'मालदांडी पस्तीस-एक' हे बियाणं म्हणजे या आघाडीचा गड्डाच आहे !"

"अहो, मग हे आधीच सांगाय पायजे व्हतं !"

साहेब म्हणाले, "मोहीमच जरा उशिरा सुरू झाली, त्याला काय करायचं ? पण तुम्ही नको का जागं व्हायला ?"

"अवो, पर तुमच्याकडनं कळल्याबिगर आमी तरी काय करनार ?"

साहेब सांगू लागले, "आमच्याकडे मागणी केली होती का तुम्ही ?"

"मागनी केली तर म्हनता, आगाऊ मागनी केली न्हाई आनि आगाऊ मागनी केली तर उशिरा बी देता. पेरनी झाल्यावर तुमचं बी मिळून उपेग काय त्येचा ?"

या मुद्याबाबत त्यांची नाना तऱ्हांनी समजूत काढून साहेबांनी पुन्हा विचारलं, "बरं, तुम्ही ज्वारी कशी पेरली ?"

"कशी म्हंजे ?"

"कोणत्या पद्धतीनं पेरली ?"

केरबा म्हणाला, "त्यात पद्धती आणखी कोंच्या असत्यात ? त्ये काय जेवान हाय व्हय, तवा एक बामनी पद्धतीनं करावं आनि दुसरं कुरवाडी पद्धतीनं करायचं ?"

"तसं नव्हे, तुम्ही ज्वारी पुणेरी पद्धतीनं पेरली का ?"

"पुणेरी पध्दतबिद्धत काय आमाला म्हाईत न्हाई. आम्ही आमच्या पद्धतीनं पेरली बगा !"

मग पुणेरी पद्धतीची ज्वारीची पेरणी कशी करायची, यासंबंधी सविस्तर माहिती

सांगतासांगता साहेबांचा जीव मेटाकुटीला आला. यातच संबंध दुपार निघून गेल्यावर गव्हाच्या लागवडीविषयी एक अक्षरही न बोलता साहेबांनी रब्बी पिकांची मोहीम यशस्वी करण्याचा संदेश देऊन दुसऱ्या गावाकडे धाव घेतली.

साहेबांच्या या प्रचाराचा इतर कुणावर जरी फारसा परिणाम दिसून आला नाही, तरी दिगंबरपंतांच्या मनावर त्याचा खोल परिणाम होऊन कोबीची लागवड त्यांच्या डोक्यात पक्की बसून गेली होती. कोबी पिकवण्याचा त्यांनी चंगच बांधला. त्याविषयीची सविस्तर बारीकसारीक माहिती त्यांनी गोळा केली. त्यासाठी खास पुन्हा एकदा शेतकी अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांनी बियाणंही पैदा केलं आणि एक एकर कोबीची लागवड त्यांनी प्रत्यक्षात आणून दाखविली.

दिगंबरपंतांच्या रानातलं हे विलायती पीक म्हणजे गावाला एक अपूपच होऊन बसलं. आजूबाजूचे लोकही बघूनबघून जाऊ लागले. अशी काहीतरी डोकं वापरून सुधारक पद्धतीची शेती करायला पाहिजे, असं चारचौघांना वाटू लागलं. दिगंबरपंत स्प्रे पंपानं पिकांवर औषध फवारू लागले, म्हणजे भोवतीभर लोक गोळा होऊन बघू लागत. 'बोर्डी-मिक्चर,' 'निकोटिन सल्फेट,' 'फॅालीडाल' अशी औषधांची नावं दिगंबरपंत तोंडानं म्हणून दाखवू लागले की लोक खुळे होऊन ऐकत राह्यचे. पिकालाही आजार वडवतो आणि त्यावर औषधी उपाय करायचा असतो, ही गोष्ट प्रथम दिगंबरपंतांनीच या गावाला दाखवून दिली. ही औषधांची नावं हळूहळू लोकांच्याही तोंडी बसून गेली; पण त्यांचा वापर पिकांवर करण्याऐवजी ते आपल्या बायकापोरांवर करू लागले. हमरीतुमरीवर आलेला नवरा सहज म्हणू लागला, "गप बस ! न्हाईतर 'बोर्डी-मिक्सच' मारीन! काय वाटलं तुला? 'फॅालीडॉल' हानीन !"

पंतांचं कोबीचं पीक औषधपाण्याच्या जोरावर झोकात आलं. पीक बघून तहानभूक हरू लागली. पंत पैसा कमावणार असं वाटू लागलं. नोकरी कनिष्ठ, व्यापार मध्यम, आणि शेती उत्तम हे पुराण-तत्त्व पंतांनी प्रत्यक्षात उतरवून दाखवलं होतं. शेतीला कल्पकतेची जोड दिली म्हणजे काय फायदा होतो याचं ते एक प्रत्यक्ष उदाहरणंच होतं. टवाळी करायला आता लोकांना जागा नव्हती. सुधारणेचा मार्ग पंतांनी दाखवून दिला होता. त्यांच्या पावलावर पाऊल टाकायला लोक तयार झाले होते. पुढच्या वर्षी जिकडेतिकडे आता कोबीची लागवड होणार होती,

होताहोता पीक तयार होऊन कापणीला आलं. पंतांनी दोन गाड्या भरून कोबी शहरात नेली. पैशांनी भरलेला खिसा घेऊनच ते परत येणार होते. दिवस मावळून कडुसं पडलं. आणि पंत बाजार आटपून घरी आले. घरातली सारी मंडळी त्यांची वाटच बघत होती. पंत घरी आल्याआल्या त्यांची पत्नी त्यांना म्हणाली, "किती आले पैसे ?"

एक नाही, दोन नाही ! पंत न बोलताच कपाळाला आठ्या घालून बसून राहिले. तशी नाना तऱ्हेच्या शंका त्यांच्या पत्नीला येऊ लागल्या. हे बोलत का नाहीत ? ह्यांना चोरांनी लुबाडलं तर नसेल ? का बाजारातच कुणी खिसा कापला आणि सारे पैसे लुबाडले, म्हणून हे न बोलता बसून राहिले आहेत ? काय झालं असावं बरं ? काही कळायला मार्ग नव्हता. पंतही काही बोलत नव्हते. अखेर धीर करून त्यांच्या पत्नीनं पुन्हा विचारलं,

"काय झालं असं न बोलायला ?"



Scanned with OKEN Scanner

"काय बोलू?"

"म्हणजे?"

पंत अधिकच खिन्न होऊन म्हणाले,

"म्हणजे काय! काही बोलण्यात अर्थच नाही!"

"अहो पण झालं तरी काय?"

"काय व्हायचं राहिलंय? जे व्हायचं तेच झालं!"

कोडं काही उकलेनासं झालं. ती न बोलताच मनाशी विचार करीत राहिली. विचार करता करता एक गोष्ट तिला आठवली आणि ती हसून म्हणाली,

"आणायला सांगितेली कापडं आणली नाहीत, म्हणून असं मुक्यांन बसला होय?"

पंत हातवारे करून एकदम म्हणाले,

"कापडं गेली खड्यात! कापडं आणतोय! काय नागव्या बसलाय का घरात, तेव्हा अलबत कपडे आणावे?"

एकंदरीत प्रकरण काहीतरी भयंकर होतं; पण काय होतं हेच कळत नव्हतं. पंत रागानं लाल झाले होते. काहीतरी त्यांच्या मनाविरुद्ध गोष्ट घडली होती. काही मनस्ताप झाला असला पाहिजे. काय घडलं असेल याचा विचार करता करता त्यांची पत्नी एकदम म्हणाली,

"उधारी भागवावी लागली का सगळी?"

"उधारी कशानं भागवू? काय दात काढून देऊ तोंडातले माझ्या?"

"दात कशाला काढायला पाहिजेत? दोन गाडी कोबी घेऊन गेला होता ना?"

"होय, गेलो होतो. पण पैशाच्याऐवजी काय कोबीचे गड्डे द्यायचे आहेत का त्यांना?"

तिनं शांतपणानं विचारलं, "अहो, पण कोबीचा पैसा आला नाही का?"

"मग तुला असं बोललो असतो का?"

"काय झालं पैसा न यायला? एवढया दोन गाड्या घेऊन गेला होता आणि पैसा आला नाही कसा?"

पंत सांगू लागले, "मी दोन गाड्या नेल्या होत्या तशा दुसऱ्यांनीही गाड्या आणल्या होत्या."

"अहो, पण आपल्या गावात तर कुठं कोबी दिसत नाही, आणि कुणी गाड्या आणल्या होत्या?"

"अग, आपल्या गावात नाही म्हणून जगात नाही असं आहे का?"

"मग बिघडलं काय?"

पंत रागानं म्हणाले, "बिघडलं काय म्हणजे? सारा कोबीनंच बाजार भरलेला! कोण विचारतोय आपल्या मालाला?"

"मग काय गिऱ्हाईक नव्हतं?"

"ते का? बागवान घेत होते की!"

"मग दिला का नाही माल?"

"अग, अडवून मागू लागले, मग कशाला देतोय? रुपया मिळायचा तिथं दोन

आणे मिळायचं चिन्ह दिसेना ! औषधांचा तरी खर्च निघायला पाहिजे का नको ?"

"मग काय, माल विकला नाही ?"

"सांगतो काय तर तुला !"

"आणि मग गाड्या कुठं आहेत ?"

पंत म्हणाले, "एक गाडी घेऊन आलोय"

"कुठं आहे ती ?"

"ती गावात फिरतेय्"

"कशाला ?"

"कशाला काय ? अग, फुकांपासरी माल देण्यापेक्षा निदान लोकांना वाटू टाकला तर आपलं नाव घेऊन खातील तरी लोक !"

"म्हणजे गावात कोबी वाटीत गाडी फिरू लागलीय् का ?"

"विचारतेस काय आणखी ? प्रत्येक घरात दोन-दोन गड्डे द्यायला सांगितलेत. एवढा घाम गाळून माल काढलाय, निदान गाव तरी खाऊन तृप्त होऊ दे !"

स्वतःशी नवल करती तिनं विचारलं,

"आणि दुसऱ्या गाडीचं काय केलंत ?"

"ती लावून दिली त्या शेतकी-अधिकाऱ्याकडे एवढा त्याच्या जिवावर आपण माल पिकवला, मग त्याला भेट द्यायला नको ? एक गाडीच्या गाडी त्याच्याकडे धाडून दिली. खाऊ द्या बिचारा ! त्याच्या ज्ञानाचंच फळ आहे ते त्याला दिसायला पाहिजेच !"

(खुळ्याची चावडी)

★ ★ ★



Scanned with OKEN Scanner